शोधप्रबंधाचा प्रस्तावित आराखडा

जी.के. ऐनापुरे यांच्या कादंबऱ्या : एक विवेचक अभ्यास

मानव विज्ञान विद्याशाखे अंतर्गत **मराठी** विषयातील

विद्यावाचस्पती (पीएच.डी.)

पदवीसाठी

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

या विद्यापीठास सादर करावयाचा शोध प्रबंधाचा

प्रस्तावित आराखडा

: संशोधक :

प्रा. संतोष दत्तराव कदम

ज्ञानोपासक कनिष्ठ महाविद्यालय, जिंतूर.

जि. परभणी.

: मार्गदर्शक :

प्रोफेसर डॉ. विलास शेषराव पाटील

मराठी विभागप्रमुख,

ज्ञानोपासक महाविद्यालय, जिंतूर.

जि. परभणी.

ऑगस्ट २०२३

जी.के. ऐनापुरे यांच्या कादंबऱ्या : एक विवेचक अभ्यास

अनुक्रमणिका

१. प्रास्ताविक १

२. संशोधनाची गरज ६

३. संशोधनाची व्याप्ती ७

४. अभ्यासाच्या मर्यादा ७

५. गृहितके ७

६. संशोधनाचे महत्त्व ८

७. संशोधनाची साधने ९

८. संशोधन पद्धती ९

९. संशोधनामागील उद्देश ९

१०. संभाव्य निष्कर्ष १०

११. प्रकरण रचना १०

१२. संदर्भग्रंथ सूची...१२

जी.के. ऐनापुरे यांच्या कादंबऱ्या : एक विवेचक अभ्यास

प्रास्ताविक :

कथात्म साहित्यातील महत्त्वाचा प्रकार म्हणून आज कादंबरीकडे पाहिल्या जाते. कादंबरीची सुरुवात ही पाश्चात्य वाङ्मयाच्या परिचयातूनच झाली, ही वस्तुस्थिती आहे. मात्र असे असले तरी प्राचीन भारतीय वाङ्मयात या साहित्य प्रकाराच्या खुणा पहावयास मिळतात. प्राचीन खंडकाव्ये ही कादंबरी वाङ्मयाची पूर्व चिन्ह मानता येतील. व्यापक जीवनपट मांडण्याची कादंबरीची शैली ही महाभारत, रामायण या खंडकाव्याच्या जवळची आहे. असे असले तरी आज अस्तित्वात असलेला कादंबरी हा साहित्यप्रकार पाश्चिमात्य साहित्याच्या परिशिलनातूनच आला आहे. इंग्रजी वाङ्मयातील मॉवेल या प्रकारातून मराठी कादंबरी अवतरली. सुरुवातीला इंग्रजी नावाच्या आधारे मराठीत या साहित्य प्रकाराला 'नावल' हा शब्द सुचविण्यात आला. परंतु तो रूढ होऊ शकला नाही. बाणभट्टाने लिहिलेल्या नवल कथेची नायिका कादंबरी हिच्या नावावरून मराठीत या साहित्य प्रकारासाठी कादंबरी हेच नाव रूढ झाले आहे.

'कादंबरी' हा साहित्यप्रकार अतिशय व्यापक आणि तितकाच लवचिक असल्यामुळे त्याची सर्वसमावेशक अशी व्याख्या करणे अवघड आहे. एका विशिष्ट कालखंडातील घडणाऱ्या घटनांची मालिका प्रतिबिंबित होऊन साहित्यात उमटत असते. मानवी जीवनात घडत असलेल्या सत्य घटनांना आपल्या कल्पनांची जोड देऊन एक प्रतिसृष्टी लेखक कादंबरीतून उभी करतो. मानवी जीवनाचा खोलवर जाऊन शोध घेणे हे प्रत्येक साहित्य प्रकाराचे उद्दिष्ट असते. तेच कादंबरीचेही आहे. स्थळ, काळ, प्रसंग, पात्र आदींची योग्य निवड करणे ही कादंबरीकाराची जबाबदारी असते. कादंबरीचे स्वरूप हे असे व्यामिश्र असले तरी काही विचारवंतांनी तिची व्याख्या करण्याचा प्रयत्न केला आहे. त्यात प्रसिद्ध साहित्यिक भालचंद्र नेमाडे यांची 'कादंबरी म्हणजे प्रदीर्घ भाषिक अवकाश असलेली आशयाचे अनेक पात्र प्रसंग अपूर्णतेपेक्षा संपूर्णतेकडे झुकलेली आहेत अशी कलाकृती होय.'

कथा ही एखादी घटना प्रसंगावर बेतलेली असते. त्यात एकच एक केंद्र असते परंतु कादंबरी ही बहुकेंद्रीय असते. घटना, प्रसंग, पात्रे यात अनेकता असली तरी त्या सर्वांमध्ये एक प्रकारची परिपूर्णता असते. उत्कृष्ट कादंबरी ही केवळ घटना प्रसंगांपुरती मर्यादित न राहता त्या काळाचा ती ऐतिहासिक दस्तऐवज होत असते.

व्याख्या :

बहुआयामी, बहुकेंद्री, गुंतागुंत असणारी कादंबरी व्याख्येच्या परिघात मावणे अवघडच असते. तरी अनेकांनी कादंबरीची व्याख्या करण्याचा प्रयत्न केला आहे. आजपर्यंत करण्यात आलेल्या कादंबरीच्या व्याख्या या तिच्या विविध अंगावर व विशेषावर प्रकाश टाकणाऱ्या आहेत. त्यातही या व्याख्या वास्तववादी कादंबरी अनुलक्षून केल्याचे जाणवते.

ना. सी. फडके : 'तांत्रिक अंगावर भर देऊन गुंतागुंत, निरगाठ आणि उकल अशी तीन स्थाने कादंबरीत असावयास पाहिजेत.'

मा. का. देशपांडे : 'कादंबरी म्हणजे जीवनाचे विस्तृत व कलात्मक गद्य चित्र होय.'

रा. ग. जाधव : 'कथानक, व्यक्तिचित्रण, लेखकाचा दृष्टिकोन व यांना अनुरूप अशी निवेदन तंत्रे, वर्णने, वातावरण निर्मिती, शैली इत्यादी घटकांनी गद्यात विस्तृतपणे संघटित केलेले वास्तव जीवनाचे चित्रण म्हणजे कादंबरी होय.'

मैथिलीशरण गुप्त : 'उपन्यास साहित्य मानव जीवन की व्याख्या और आलोचना है।'

श्यामसुंदर दास : 'उपन्यास मनुष्य के वास्तविक जीवन की काल्पनिक कथा है।'

हेन्री जेम्स : 'कादंबरी म्हणजे वैयक्तिक जीवनानुभव होय.'

डेविड सीसील : 'जीवित जगताचा परिचय करून देणारी एक कला म्हणजे कादंबरी होय.'

अर्नेस्ट बेकर : 'ज्यात मानवी जीवनाचे स्पष्टीकरण केले गेले असेल अशा गद्यात लिहिलेला कल्पित वृत्तांत म्हणजे कादंबरी होय.'

अशाप्रकारे अनेक विद्वानांनी कादंबरीच्या व्याख्या करण्याचा प्रयत्न केला आहे. या व्याख्यांवरून कादंबरीची काही लक्षणे समोर येतात. मानवी जीवनाचे प्रतिबिंब म्हणजे कादंबरी परंतु हे प्रतिबिंब कलात्मक असते.

कादंबरीचे घटक :

कादंबरीची सर्वसमावेशक अशी व्याख्या देता येत नसली तरी कादंबरीचे काही घटक निश्चित सांगता येतात. यात प्रामुख्याने कथानक, पात्र, वातावरण, विश्व, भाषाशैली, निवेदन शैली, लेखकाचा दृष्टिकोन यांचा समावेश होतो. प्रत्येक कादंबरीत हे सर्व घटक येतीलच असे नाही परंतु प्रत्येक कादंबरीत हे घटक कमी अधिक प्रमाणात असतातच हे मात्र निश्चित.

मराठी कादंबरीची पूर्वपीठिका :

इंग्रज राजवटीत पाश्चात्य साहित्याच्या परिशीलनातून भाषांतराच्या माध्यमातून मराठी कादंबरीचा परिचय झाला. इ.स. १८४१ मध्ये हरी केशवजी यांनी जॉन बनियन यांच्या 'पिलीग्रीम्स प्रोग्रेस' या कादंबरीचे 'यांत्रिक क्रमण' या नावाने भाषांतर केले. 'अरबी भाषेतील सुरस कथांचे' मराठीत भाषांतर कृष्णशास्त्री चिपळूणकर यांनी केले. रॉबिन्सन क्रुसो यांचा 'गॉलीव्हरचा वृत्तांत' आणि इतर पुस्तके भाषांतरीत करण्यात आली. पुढील काळात म्हणजे इ.स. १८५७ मध्ये एका हिंदू विधवेचा करूण जीवनवृत्तांत मांडणारी 'यमुना पर्यटन' ही कादंबरी बाबा पद्मनजी यांनी लिहिली. त्यांच्यावर ख्रिस्ती मिशनऱ्यांचा प्रभाव स्पष्ट दिसून येतो. तरी पहिली स्वतंत्र आणि सामाजिक कादंबरी म्हणून ती परिचित आहे. इ.स. १८६१ मध्ये लक्ष्मण शास्त्री हळबे यांची 'मुक्तामाला' ही अद्‌भुतरस प्रधान कादंबरी आली आणि मराठीत पुढे अशा अनेक कादंबऱ्यांची लाटच आली. रा. भी. गुंजीकरांच्या 'मोचनगड' या कादंबरीच्या रूपाने मराठीत ऐतिहासिक कादंबरीला सुरुवात झाली. तर सामाजिक कादंबरी प्रवाहाची नांदी हरिभाऊ आपटे यांची 'मधली स्थिती' ही (१८८५) कादंबरी ठरली. त्यांनी 'पण लक्षात कोण घेतो', 'यशवंतराव खरे', 'भयंकर दिव्य', 'कर्मयोग' आदी सामाजिक कादंबऱ्या लिहिल्या.

१९२० ते १९४५ या कालखंडात कादंबरी वाङ्मयात मोलाची भर पडली. कलेसाठी कला आणि जीवनासाठी कला असा तथाकथित कलावाद आणि जीवनवाद हा वाङ्मयीन वाद मांडणारे ना. सी. फडके आणि वि. स. खांडेकर यांनी विपूल कादंबरी लेखन केले. यात फडके यांच्या 'जादूगर' (१९२८), 'निरांजन' (१९३२), 'एल्गार' (१९३५) या कादंबऱ्या तर वि. स. खांडेकर यांच्या 'हृदयाची हाक' (१९३०), 'कांचनमृग' (१९३१), 'दोन ध्रुव' (१९३४), 'उल्का' (१९३४), 'दोन मने' (१९३८), 'हिरवा चाफा' (१९३९) या कादंबऱ्यांचा उल्लेख करता येईल. याच कालखंडात डॉ श्री. व्यं. केतकर यांनी 'परागंदा' (१९२६), गोंडवनातील 'प्रियवंदा' (१९२६), 'ब्राह्मण कन्या' (१९३०) या कादंबऱ्या लिहिल्या. त्यानंतर वा. म. जोशी यांनी जीवनातील नैतिक, तात्त्विक प्रश्नांना अनुलक्षून 'रागिनी', 'नलिनी' या कादंबऱ्या लिहिल्या. इंदू काळे सरला भोळे विश्राम बेडेकर यांनी 'रणांगण' (१९३९) मधून दुसऱ्या महायुद्धाच्या पार्श्वभूमीवर प्रेमाची शोकांतिका व्यक्त केली. ग. ल. ठोकळ यांची 'गावगुंड' व र. वा. दिघे यांच्या 'पानकळा', 'सराई' (१९४४) इत्यादी कादंबऱ्या आल्या.

१९४५ नंतर कादंबरी वाङ्मयात अधिक समृद्ध झाले श्री. ना. पेंडसे (एल्गार, हद्दपार, गारंबीचा बापू), विभावरी शिरूरकर (बळी), गंगाधर गाडगीळ (लिलीचे फुल), गो. नी. दांडेकर (पडघवली, माचीवरचा बुधा, शितू, जैत रे जैत), व्यंकटेश माडगूळकर (बनगरवाडी) आदीं प्रमुख कादंबरीकारांचा उल्लेख करता येईल.

१९६० नंतर मराठी साहित्यात मोठे परिवर्तन झाले. ग्रामीण भागातील, तळागाळातील संवेदनशील, सर्जनशील तरुण आपल्या जीवनातील अनुभव स्वतःच्या बोलीतून व्यक्त करू लागला. यातूनच त्या काळात ग्रामीण, दलित, आदिवासी इत्यादी साहित्य प्रवाह निर्माण झाले. उद्धव शेळके यांची 'धग' सारखी कादंबरी अवतरली. रणजीत देसाई यांची ऐतिहासिक पार्श्वभूमीची 'स्वामी' (१९६२), शिवाजी सावंत यांच्या 'मृत्युंजय', 'छावा', 'युगंधर' इत्यादी कादंबऱ्या प्रकाशित झाल्या. भालचंद्र नेमाडे यांनी 'कोसला' (१९६३) लिहून कादंबरीला एक वेगळीच वाट चोखाळली. जयवंत दळवी 'चक्र' (१९६३), भाऊ उपाध्ये 'डोंबाऱ्याचा खेळ', 'वैतागवाडी', 'वासूनाका', 'बॅरिस्टर अनिरुद्ध धोपेश्वरकर' इत्यादी कादंबऱ्या लिहिल्या. कमल देसाई 'रात्रंदिन आम्हा युद्धाचा प्रसंग' (१९६४), शंकर पाटील 'टारफुला' (१९६४), चंद्रकांत खोत 'उभयान्वयी अव्यय', किरण नगरकर 'सात सक्क त्रेचाळीस', प्रभाकर पेंढारकर 'रारंगढांग' तर शाम मनोहर यांच्या 'हे ईश्वरराव हे पुरुषोत्तमराव' या कादंबऱ्यांचा उल्लेख करता येईल. स्वातंत्र्योत्तर काळात लोकांचा मोठा भ्रमनिरास झाला. स्वातंत्र्य मिळवूनही सामान्य माणसांचे प्रश्न संपले नाहीत. त्यातून सामान्यांच्या या प्रश्नांवर अनेक कादंबऱ्या लिहिल्या गेल्या.

१९९० नंतर आपल्या सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक व भावजीवनात उलथापालथ घडवणारी मोठी घटना म्हणजे जागतिकीकरण. या घटनेमुळे मानवी जगणे अंतर्बाह्य बदलून गेले. साहाजिकच याचे पडसाद मराठी साहित्यात आणि कादंबरी वाङ्मयातही उमटले. नव्वदोत्तर कादंबरीत अनेक दर्जेदार कादंबरीकार पुढे आले. जागतिक स्तरावरील व्यापार, अर्थकारण, संस्कृती, राजकारण, दहशतवाद यासारख्या घटकांशी सर्वसामान्य माणसांचे रोजचे जगणे मरणे विचार करणे प्रतिक्रिया देणे अथवा काहीच न करता निष्क्रिय होणे किंवा एकूणच आपले सगळे अस्तित्व यांच्याशी अधिक तीव्रपणे जोडले गेल्यामुळे या कालखंडाचा प्रभाव जीवनाच्या सर्वच क्षेत्रावर पडलेला जाणवतो. या वर्तमानाचे भान राखून आजच्या या गोंधळाच्या विस्कळीत झालेल्या नव्या वास्तवाची मांडणी करणारी कादंबरीकरांची एक पिढी या दोन अडीच दशकात पुढे आलेली दिसून येते.

जी. के. ऐनापुरे यांची कादंबरी :

जी. के. ऐनापुरे यांचे कादंबरी विश्व अचाट आणि अफाट आहे. त्यांच्या आजतागायत एकूण सहा कादंबऱ्या प्रसिद्ध आहेत. त्यात अवकाश (१९९७), अभिसरण (२००२), अधुरा (२००६), रिबोट (२००८), जाईच्या घरी जाई (२०१०) आणि ओस निळा एकान्त (२०२२) यांचा समावेश आहे. त्यांच्या 'रिबोट' या कादंबरीला २०१० चा महाराष्ट्र फाउंडेशनचा पुरस्कार मिळाला आहे. त्यांच्या 'अभिसरण' आणि 'ओस निळा एकान्त' या कादंबऱ्यांमधून आंबेडकरी जाणिवा व्यक्त होत असल्या तरी केवळ आंबेडकरी किंवा दलित लेखक एवढीच त्यांची ओळख नाही तर मानवी जीवनाचा तळ शोधू पाहणाऱ्या श्रेष्ठ लेखकांमध्ये त्यांचा अग्रक्रम लागतो. नव्वदोत्तर मराठी कादंबरीत त्यांचे लेखन आपले एक वेगळे स्थान निर्माण करते. जी. के. ऐनापुरे हे आजच्या पिढीतील एक महत्त्वाचं नाव आहे. कादंबरीच्या क्षेत्रात त्यांची ओळख वेगळ्या प्रकृतीचे आणि गांभिर्याने लेखन करणारे लेखक म्हणून रूढ झाली आहे.

त्यांची 'अभिसरण' ही कादंबरी म्हणजे आंबेडकरी चळवळीतील तिसऱ्या पिढीतील नेतृत्वाचे आत्मकथन आहे. दलित चळवळीचा गाढा अभ्यास आणि तिच्याशी असलेली अतूट बांधिलकी; दलित नेतृत्वाला आजच्या वास्तवावर आरपार समजून घेण्याची क्षमता आणि आंबेडकरी विचारप्रणालीतील दूरदृष्टी वरील अव्यभिचारीनिष्ठा या सर्वांच्या मिश्रणातून या कादंबरीचे लेखन झालेले असल्यामुळे तिला एक वाङ्मयीन मूल्यही प्राप्त झाले आहे. त्यांच्याच 'ओस निळा एकांत' मधून त्या पुढील आंबेडकरी राजकारण, समाजकारण, सांस्कृतिक, मानसिक पातळीवरील अवस्था अधोरेखित केली आहे. यात मध्यमवर्गीय आंबेडकरी कुटुंबाची, समाजाची, चळवळीची सद्यस्थिती कशी आहे याचा आलेख मांडणारी, त्यावर चर्चा करणारी, एका निष्कर्षापर्यंत जाण्याची तयारी ठेवणारी मांडणी हे या कादंबरीचे वैशिष्ट्य आहे. बुद्ध, मार्क्स, आंबेडकर यांच्या समन्वयाचा धागा आंबेडकरी समाजाला बांधून ठेवू शकेल हा आशावाद प्रस्तुत कादंबरीचा महत्त्वाचा गाभा आहे.

ऐनापुरे यांच्या 'अधुरा' आणि 'रिबोट' या कादंबऱ्यांमधून मुंबईतील गिरणी संप आणि त्या निमित्ताने गिरणगावाची झालेली वाताहत चित्रित करण्यात आली आहे. महानगरीय झोपडपट्ट्यातील वातावरण, तेथील सुष्ट दुष्ट प्रवृत्ती, गिरण्या बंद झाल्याने गिरणी कामगारांची

विशेषतः बाहेरून कामासाठी आलेल्या मजुरांची वाताहत या कादंबऱ्या मांडतात. 'रिबोट' मधून कामगार संघटनांचे राजकारण आणि त्यामुळे गिरण गावातून हद्दपार झालेला कामगार वर्ग त्यातून आलेली आर्थिक आणि सांस्कृतिक बकालता प्रत्ययकारी उतरली आहे. त्यांच्या या कादंबऱ्या आशय आणि भाषेच्या अंगाने नव्या शक्यता सूचित करतात.

एक कादंबरीचा नायक चित्रकार पेंटर व्यवसायात येऊन कामगार बनतो आणि त्याच्यातील कलावंताचा कोंडमारा सुरू होतो. या दोन भूमिकांमधील ताणतणावातून ऐनापुरे यांची 'अवकाश' ही कादंबरी आकाराला येते. यातील नायक सर्जनशीलतेचे चौरस फुटात मोजमाप करणाऱ्या भ्रष्ट आणि असुया - स्पर्धेच्या जगात वेढला गेला आहे. मराठी नव कादंबरीत प्रामुख्याने मध्यमवर्गीय सुशिक्षित नायकांच्या माध्यमातून प्रकटलेली आत्मदूराव्याची कल्पना अवकाश ने श्रमिकांच्या अवनत झालेल्या सामाजिक संबंधांच्या दैनंदिन जगात उभी केली आहे.

ऐनापुरेंच्या सर्वच कादंबऱ्यांमधून जाणवणारा महत्त्वाचा विशेष म्हणजे लैंगिकतेचे उघडे नागडे प्रदर्शन अत्यंत धीटपणे त्यांच्या कादंबऱ्यांमधून चितारले आहे. मराठी कादंबरी विश्व या आदी मानवी लैंगिकतेचे चित्रण करण्यास अपुरी पडल्याचे जाणवत असतानाच जी.के. च्या कादंबऱ्यांतून ते अधिक स्पष्ट स्वरूपात चित्रित केले आहे. त्यामुळे त्याची तीव्रता कादंबरीच्या केंद्रस्थानी येते. परंतु हे लैंगिक जीवन अपरिहार्य म्हणून त्यांच्या कादंबऱ्यात येते ओढून ताणून आणण्याचा कुठलाही प्रयत्न येथे दिसून येत नाही.

जी.के. यांचे कादंबरी विश्व या दशकातील अत्यंत महत्त्वाचे आहे. खरे-खुरे जीवन कादंबरी रूप घेऊन आपल्या भोवतालाला कवेत घेण्याचा प्रयत्न करते. यात कुठेही कृत्रिमता जाणवत नाही. अत्यंत नैसर्गिक पद्धतीने त्यांची कादंबरी वाटचाल करते. विचारांचे अधिष्ठान तिला प्राप्त झाल्याने एक अंगभूत स्वर्ण झळाळी तिला प्राप्त होते.

संशोधनाची गरज :

प्रस्तावनेत विशद केल्याप्रमाणे सहा प्रकाशित कादंबऱ्यांच्या आधारे जी. के. ऐनापुरे यांच्या कादंबरी साहित्याचा विवेचक शोध घेणे ही संशोधनाची गरज आहे. साहित्य आणि समाज, समाजव्यवस्था, नीतीमूल्य, विवेकाचे भान, संवैधानिक मूल्यांवरची अढळनिष्ठा, आत्मशोध, माणूसपणाचा संस्कार, बदलत्या वैश्विक परिवेशात मानवतावादी दृष्टी इत्यादी बाबींसंदर्भात महत्त्वाचे आणि भरीव मौलिक असे काही करता येईल त्यासाठी प्रस्तुत संशोधन कार्य गरजेचे आहे.

संशोधनाची व्याप्ती :

या शोध प्रबंधाची व्याप्ती कादंबरीकार जी. के. ऐनापुरे यांच्या कादंबऱ्यांचा सर्वांगीण दृष्टिकोनातून अभ्यास करणे ही आहे. म्हणजेच जी.के. ऐनापुरे यांच्या 'अवकाश' (१९९७), 'अभिसरण' (२००२), 'अधुरा' (२००६), 'रिबोट' (२००८), 'जाईच्या घरी जाई' (२०१०) आणि 'ओस निळा एकान्त '(२०२२) या कादंबऱ्यांच्या आधारे संशोधन करण्यात येईल.

अभ्यासाच्या मर्यादा :

जी. के. ऐनापुरे यांच्या प्रकाशित सहा कादंबऱ्या यांच्या विशेषांचा अभ्यास या संशोधनात अंतर्भूत आहे. त्यांच्या प्रकाशित कादंबऱ्या हे या संशोधनासाठी लिखित सामग्री असेल. त्यासाठी मुलाखत घेण्यात येईल. या व्यतिरिक्त त्यांच्या कथा किंवा समीक्षा तसेच इतर दुसऱ्या कोणत्याही विषयाचा अभ्यास अपेक्षित नाही. याशिवाय त्यांच्या काही कादंबऱ्यांची अन्य भाषेत झालेली भाषांतरेही यात समावेशित नाहीत.

गृहितके :

१. जी. के. ऐनापुरे यांचे कादंबरी लेखन विलक्षण असून मराठी कादंबरी साहित्यात त्यांचे योगदान महत्त्वाचे आहे. त्यांच्या कादंबरी निर्मितीची प्रक्रिया त्यांचा सर्जनशोध घेणे आवश्यक आहे.

२. जागतिकीकरणातून आलेले कंगालपण, नीतीमूल्यांची घसरण, अशांतता, बाजारीकरण, हरवत चाललेले माणूसपण, जातवर्ग व्यवस्था, विस्कळीत समाज व्यवस्था या सर्वांचे अत्यंत प्रत्ययकारी वर्णन जी. के. ऐनापुरे यांच्या कादंबरीतून आलेले असून ते अंतर्मुख करणारे आहे. त्या संबंधाने धांडोळा घेणे गरजेचे आहे.

३. महानगरीय कादंबरी त्यातही गिरणी संपामुळे उध्वस्त झालेले गिरणगाव देशोधडीला लागलेला तेथील कामगार. कामगार सेना, लालबावटा व इतर दुय्यम संघटनांचा त्या संपाच्या निमित्ताने झालेला अंत. काँग्रेसची राजकारणाची हतबलता आणि यामुळे सामान्य माणसाच्या मनात निर्माण झालेल्या द्वद्वांचा वेध ऐनापुरे यांची कादंबरी घेते. त्यातून महानगरीय जीवनाचा वेध घेणाऱ्या कादंबरीकारात त्यांचे नाव अग्रस्थानी घ्यावे लागते.

४. त्यांच्या आंबेडकरी जाणीवांच्या कादंबऱ्यातून त्यांनी आंबेडकरी जनतेसमोर आरसा धरला आहे. दलित कादंबरीतून येणारे शोषणाचे कथन त्यांच्या कादंबऱ्यात आत वळले आहे. ही अंतर्मुखता कठोर आत्मचिकित्सेपर्यंत आणि अंतिमतः आत्मभाना पर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न करते. आंबेडकरी विचार प्रणालीतील दूरदृष्टी वरील अव्यभीचारीनिष्ठा आणि आजच्या वास्तवाला जाणून घेण्याची क्षमता त्यामुळे ऐनापुरे यांच्या आंबेडकरी कादंबरीला अनन्यसाधारण असे वाङ्मयीन मूल्यही प्राप्त झाले आहे.

५. केवळ महानगरीय लेखक किंवा केवळ आंबेडकरवादी लेखक म्हणून जी.के. ऐनापुरे यांना मर्यादित करता येत नाही. आजच्या पिढीतील कादंबरीच्या क्षेत्रात त्यांची ओळख वेगळ्या प्रकृतीचे आणि गांभिर्याने लेखन करणारे लेखक म्हणून रूढ आहे.

६. जी. के. ऐनापुरे यांची कादंबरी आशया बरोबरच भाषेच्या अंगाने नवीन शक्यता निर्माण करताना दिसते.

संशोधनाचे महत्त्व :

एकविसावे शतक उगवतानाच आपल्या ओटीत जागतिकीकरणाची प्रक्रिया घेऊन आले. अर्थकारणाबरोबरच जागतिकीकरणाने मानवी जीवनाच्या सामाजिक, भावनिक, मूल्यात्मक, नैतिक अशा सर्वच अंगात मोठी उलथापालथ घडवून आणली. या सर्व गदारोळात माणूस हा केंद्रस्थानी आहे हा विचार बाजूला पडण्याची शक्यता निर्माण झाली आहे. अशा या आजच्या वास्तवात ऐनापुरे यांचे साहित्य मात्र माणूसपणाचा धागा घट्ट करण्याचे काम करत आहे. या सर्व प्रयत्नांना अधोरेखित करणे अत्यंत गरजेचे आहे. जी. के. ऐनापुरे यांना दलित साहित्यात उच्च स्थान प्राप्त आहे. परंतु त्यांच्यासारख्या सर्जनशील लेखकाला विशिष्ट चाकोरीत अडकवून न ठेवता मुख्य प्रवाहात त्यांची प्रतिष्ठापना होणे अत्यंत गरजेचे आहे. केवळ त्यातूनच मराठी साहित्याचा प्रवाह अधिक व्यापक व सर्वंकष होऊ शकतो. ऐनापुरे यांची निर्मिती प्रक्रिया प्रयोगशीलता उलगडून दाखविणे, त्यांच्या लेखन शैलीचा शोध घेणे, त्यांच्या कादंबरीतील वैचारिक सौंदर्य स्थळे, लेखकाची अनुभव प्रक्रिया त्यांच्या व्यक्तित्वाची जडणघडण यांचा त्यांच्या कादंबऱ्यांच्या संदर्भात अन्वयार्थ लावणे हे सारे संशोधनातूनच सिद्ध होऊ शकते. या सर्वांमधून प्रस्तुत संशोधनाचे महत्त्व अधोरेखित होते.

संशोधनाची साधने :

१. प्रस्तुत संशोधनासाठी जी.के. ऐनापुरे यांच्या प्रकाशित मूळ कादंबऱ्या यांचा आधारभूत साहित्य म्हणून वापर करण्यात येईल.

२. वाङ्मयीन अभ्यासकांशी चर्चा करून त्यांच्याकडून जी.के. ऐनापुरे यांच्या कादंबरी विषयी मिळालेली माहितीची वस्तुनिष्ठपणे नोंद घेण्यात येईल.

३. कादंबरीकार जी. के. ऐनापुरे यांची प्रत्यक्ष मुलाखत घेतल्या जाईल. या मुलाखतीतून काही महत्त्वाचे निश्चितच हाती लागेल. त्यातील काही महत्त्वपूर्ण आणि ठळक नोंदी शोध प्रबंधात घेतल्या जातील.

४. ग्रंथालयातील संदर्भग्रंथ तसेच इतर आवश्यक त्या ग्रंथांचा वापर संशोधनाच्या गरजेप्रमाणे करण्यात येईल.

५. नियतकालिके, विशेषांक यातील उपयुक्त लेख, इंटरनेटवरील लेख, ब्लॉग, स्फुटलेखन त्यांची विश्वासार्हता पडताळून आणि गुणवत्ता विचारात घेऊन संशोधन कार्यासाठी वापरण्यात येईल.

संशोधन पद्धती :

'जी.के. ऐनापुरे यांच्या कादंबऱ्या : एक अभ्यास' करीत असताना अभ्यासातील प्राथमिक स्त्रोत आणि दुय्यम स्त्रोतांचा योग्यरीत्या वापर करण्यात येईल. तसेच मुलाखत, विश्लेषण, विवरणात्मक, प्रसंगी तौलनिक संशोधन पद्धती, ऐतिहासिक वर्णनात्मक संशोधन पद्धती, चरित्रात्मक संशोधन पद्धती व इंटरनेट वरील साहित्य पद्धतीचा अवलंब करण्यात येईल.

संशोधनामागील उद्देश :

१. मराठी आंबेडकरी जाणिवेच्या लेखानाचे व्यवच्छेदक लक्षण आणि निर्मितीमागील प्रेरणांचा शोध घेणे. जी. के. ऐनापुरे यांचा या प्रवाहाशी सहसंबंध प्रस्थापित करता येईल की नाही याची मांडणी करणे.

२. नव्वदोत्तोर कादंबरी वाङ्मयाची वैशिष्ट्ये, स्वरूप, त्यातील मर्म स्थळे टिपून दर्जेदार लेखन परंपरांचा स्थूल आढावा घेऊन यात जी.के. ऐनापुरे यांच्या योगदानावर चिंतनशीलता प्रकट करणे.

३. कादंबरी वाङ्मयातील आकृतीबंध सांभाळत लेखक आपली प्रयोगशीलता प्रतिभाशक्ती कशी आजमावतो हे सकारण समजून घेणे. या पैलूंवर जी.के. ऐनापुरे यांच्या कादंबरी लेखनाचे अभ्यासपूर्वक विवेचन करणे.

४. जी.के. ऐनापुरे यांनी आपल्या कादंबऱ्यांतून सामाजिक, आर्थिक, धार्मिक, सांस्कृतिक, शैक्षणिक व राजकीय स्वरूपाचे बदलते चित्र समोर आणले आहे. त्याचा शोध घेऊन लेखकाच्या वेगळेपणाचा शोध घेणे.

५. जी.के. ऐनापुरे यांच्या कादंबरी लेखनातील वैचारिक भूमिका समजावून घेणे.

६. भाषाशैली, शब्दकळा, आशय, विषय, पात्रसृष्टी या दृष्टीने ऐनापुरे यांच्या कादंबरी साहित्याचा मागोवा घेणे.

संभाव्य निष्कर्ष :

प्रस्तुत संशोधनाच्या आधारे केवळ आंबेडकरी किंवा केवळ महानगरीय साहित्य प्रवाहातच नव्हे तर एकूणच मराठी साहित्याच्या प्रवाहात जी.के. ऐनापुरे यांचे महत्त्वाचे योगदान आहे हे दिसून येईल. मराठीतील प्रयोगशील शैलीदार साहित्यिक म्हणून मान्यवर साहित्यिकांच्या मांदीयाळीत ते अग्रस्थानी असतील.

प्रकरण रचना :

प्रकरण पहिले - उपोद्घात

या प्रकरणात मराठी साहित्यातील कादंबरी वाङ्मयाचा थोडक्यात परामर्श व कादंबरी वाङ्मयाची पार्श्वभूमी सांगून कादंबरीकार जी. के. ऐनापुरे यांचा सहसंबंध स्पष्ट करण्यात येईल.

प्रकरण दोन - कादंबरी : स्वरूप आणि संकल्पना

कादंबरी या वाङ्मय प्रकाराच्या व्याख्या, अर्थ, संकल्पना आणि स्वरूप मराठी कादंबरीच्या प्रेरणा, उदय तसेच कालखंडागणिक कादंबरीचे बदलत गेलेले स्वरूप, जागतिकीकरण आणि १९९० नंतरची मराठी कादंबरी आदींचा शोध या प्रकरणात घेण्यात येईल.

प्रकरण तीन - १९९० नंतरची मराठी कादंबरी : एक आढावा

या प्रकरणात १९९० नंतरचे महत्त्वाचे कादंबरीकार त्यांच्या महत्त्वाच्या कादंबऱ्या आशय आणि अभिव्यक्तीचे प्रयोग त्या आधारे बदलत जाणारे मराठी कादंबरीचे स्वरूप याचा आढावा घेण्यात येईल.

प्रकरण चार - जी. के. ऐनापुरे यांचे जीवन आणि साहित्य

जी.के. ऐनापुरे यांचे व्यक्तित्व आणि साहित्य विचारवंत जी. के. ऐनापुरे यांचा जीवन प्रवास, त्यांची वाटचाल, प्रमुख घटना प्रसंग, वैचारिक भूमिका, त्यांनी भूषविलेली पदे, त्यांना मिळालेले विविध पुरस्कार असा जीवनपट या प्रकरणाद्वारे उलगडून दाखविण्यात येईल. त्यातूनच एखाद-दुसरा धागा सकस साहित्य निर्मितीच्या मुळाशी जाऊन पोहोचतो का? याचाही शोध या प्रकरणातून घेतला जाईल.

प्रकरण पाच - जी.के. ऐनापुरे यांच्या कादंबऱ्या : अभिव्यक्तीचे स्वरूप

या प्रकरणात जी.के. ऐनापुरे यांच्या प्रकाशित सहा कादंबऱ्यांचा अभ्यास अपेक्षित असून त्याद्वारे त्यांच्या अभिव्यक्तीचे स्वरूप व्यक्त होणारा जीवनानुभव मानवी जीवनाच्या शोधाची प्रयत्नशीलता त्यातून अभिव्यक्त होणारा जीवन आशय यांचा शोध घेण्यात येईल.

प्रकरण सहा - जी.के. ऐनापुरेंच्या कादंबरीतील व्यक्तिरेखा

ऐनापुरांच्या कादंबरीतून विविध प्रकारच्या विविध स्तरातील तसेच विविध प्रवृत्तीच्या व्यक्तिरेखा समोर येतात. त्या व्यक्तिरेखांचे भावविश्व त्यांच्या जाणवेतील कृती, विचारधारा, जीवनदृष्टी आदींचा या प्रकरणात अभ्यास अपेक्षित आहे.

प्रकरण सात - जी.के. ऐनापुरे यांच्या कादंबऱ्यांची भाषाशैली

प्रस्तुत प्रकरणात जी.के. ऐनापुरे यांनी आपल्या कादंबरीत अभिव्यक्तीसाठी वापरलेली भाषा, प्रयोग, आशय व्यक्त करण्याची तिची ताकद, व्यक्तीनुरूप भाषा योजना, वाक्यप्रचार, विशिष्ट अर्थाचे शब्द, निवेदन शैली, संवादत्मकता, प्रतिमा आणि प्रतीके, कादंबरीतून येणाऱ्या शिव्या, लैंगिक वर्णने आदींचा सूक्ष्म अभ्यास करण्यात येईल.

प्रकरण आठ - उपसंहार

जी.के. ऐनापुरे यांची कादंबरी वांग्मय प्रकारातील साहित्यविषयक निर्मितीशीलता, प्रयोगशीलता, वैचारिकता, शब्दकळा, भाषाशैली, आशय, विषय, अभिव्यक्ती भाषा विशेष इत्यादी घटकांच्या अनुषंगाने मूळ साहित्य कृतींचे सूक्ष्म तपशीलवार परिषद या शेवटच्या प्रकरणात करण्यात येईल. मूल्य निर्धारण प्रक्रिया अवलंबिली जाईल. याप्रकारे सखोल चिकित्सक अभ्यासांती संशोधनाचे निष्कर्ष नोंदविण्यात येतील. त्यानंतर रीतसर समारोप करण्यात येईल.

सदरील विषयाच्या प्रबंध लेखनाचा स्थूल आराखडा संशोधकाच्या आत्तापर्यंतच्या अभ्यासाला अनुलक्षून सादर केला आहे. विषयाचा अभ्यास करीत असताना आणखी काही वेगळे संदर्भ हाती लागले तर या आराखड्यामध्ये आवश्यक तो बदल केला जाऊ शकतो.

संदर्भग्रंथ सूची :

१. जी. के. ऐनापुरे, अवकाश मंजूल प्रकाशन, १९९७.

२. जी.के. ऐनापुरे, अभिसरण, सुगावा, २००२.

३. जी.के. ऐनापुरे, अधुरा, अक्षरदीप, २००६.

४. जी.के. ऐनापुरे, रिबोट, शब्द, २००८.

५. जी. के. ऐनापुरे, जाईच्या घरी जाई, साकेत, २०१०.

६. जी. के. ऐनापुरे, ओस निळा एकांत, शब्द, २०२२.

७. हरिश्चंद्र थोरात, कादंबरीविषयी, पद्मगंधा, २००६.

८. उषा हस्तक, साहित्य अध्यापन आणि प्रकार, मौज, १९८७.

९. कुसुमावती देशपांडे, मराठी कादंबरीचे पहिले शतक, मुंबई, मराठी साहित्य संघ, १९७५.

१०. शंकर विभुते, स्वातंत्र्योत्तर मराठी कादंबरीची वाटचाल, स्वरूप, २०१०.

११. राजन गवस, गेल्या अर्ध शतकातील मराठी कादंबरी, संपादक विलास खोले, लोक वाङ्मयग्रह.

१२. भालचंद्र नेमाडे, टीका स्वयंवर, साकेत, २००१.

१३. विजय तेंडुलकर, कादंबरी दोन, राजहंस, २००४.

१४. दिलीप धोंडगे, कादंबरी स्वरूप आणि रचना, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक.

१५. संपा अशोक कोठावळे, ललित, दिवाळी विशेषांक कादंबरी, २०१३.

१६. संपा डॉ. सुखदेव ढाणके, सर्व धारा, दशकपूर्ती विशेषांक नवोदत्तर मराठी कादंबरी सप्टेंबर, २०१७.

१७. डॉ यशवंत मनोहर, बांधिलकी आणि साहित्य, सिल्व्हिया, १९८३.

१८. डॉ रावसाहेब कसबे, आंबेडकरवाद तत्व आणि व्यवहार, सुगावा, १९८९.

१९. डॉ चंद्रकांत बांदिवडेकर, मराठी कादंबरी चिंतन आणि समीक्षा, मेहता, १९८३.

२०. उषा हस्तक, कादंबरी आणि मराठी कादंबरी, साहित्य सेवा, १९९३.

२१. डॉ रवींद्र ठाकूर, मराठी ग्रामीण कादंबरी, मेहता, १९९३.

२२. डॉ नागनाथ कोत्तापल्ले, साहित्याचा अन्वयार्थ, मेहता, १९९६.

२३. भालचंद्र फडके, मराठी कादंबरीची वाटचाल.

संशोधक

प्रा.संतोष दत्तराव कदम
ज्ञानोपासक कनिष्ठ महाविद्यालय,
जिंतूर जि.परभणी

मार्गदर्शक

प्रोफेसर डॉ. विलास शेषेराव पाटील
मराठी विभागप्रमुख
ज्ञानोपासक महाविद्यालय, जिंतूर
जि.परभणी